ऐक्य
९१ वर्षांची वाचनीय परंपरा

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव



# श्रमसंस्कार शिबिरातून श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त होते : बर्गे

सातारा, दि. १८ : कोरेगाव येथील डी. पी. भोसले कॉलेजच्यावतीने प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी शिरढोण येथे श्रमसंस्कार शिबिर घेऊन विद्यार्थ्यांच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली आहे, असे प्रतिपादन कोरेगाव शहर विकास मंचचे अध्यक्ष व कोरेगाव तालुका खरेदी-विक्री संघाचे संचालक किशोर बर्गे यांनी केले. कोरेगाव येथील डी. पी. भोसले कॉलेजच्या शिरढोण येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरात ते बोलत होते. यावेळी कोरेगाव तालुका गटविकास अधिकारी सौ. अर्चना वाघमळे, शिरढोणच्या सरपंच सौ. आवडाबाई खंडाईत, उपसरपंच सौ.आशा चव्हाण, डॉ. सतीश सायकर, प्रा.नीलेश गोसावी, प्रा.विजयकुमार मोकाशी उपस्थित होते.



प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांना पुस्तके भेट देताना किशोर बर्गे, व्यासपीठावर सौ. अर्चना वाघमळे व मान्यवर.

यावेळी कोरेगाव शहर विकास मंचच्यावतीने बर्गे यांच्या हस्ते दिवंगत माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या वाचनीय पुस्तकांचा संच प्राचार्य डॉ. सावंत यांच्याकडे भेट देण्यात आला. प्रारंभी प्राचार्य डॉ. सावंत यांनी सौ.अर्चना वाघमळे, किशोर बर्गे व रामचंद्र बोतालजी यांचा श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. सौ.वाघमळे म्हणाल्या, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वच्छ भारत मिशन हा शासनाचा उपक्रम राबविला जातो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना हे शिबिर निश्चितच प्रेरणादायी ठरेल. बोतालजी म्हणाले, शिरढोण सारख्या ग्रामीण भागात ग्रामस्थांच्या सहकार्याने विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना श्रम संस्काराचे महत्त्व पटविले आहे. डी. पी. भोसले कॉलेजचा हा स्त्युत्य उपक्रम आहे.

कार्यक्रमास प्रा. सौ. यू. एस. मदने, प्रा. पी. के. घाटगे, प्रा. डी. डी. कोरडे, प्रा. श्रीमती आर. एस. शिंदे, प्रा. डी. बी. पवार, प्रा. एस. व्ही. माने, प्रा. सौ. एस. डी.पाटील, जयवंत घोरपडे, विक्रम घोरपडे, हिंदुराव साळुंखे, विजय घोरपडे, मंचचे कार्याध्यक्ष दिलीप बर्गे, विठ्ठल काटे, पोपट बर्गे, प्रकाश बर्गे, अनिल पवार, अधिक जाधव, विनोद गोरे, ग्रामपंचायत सदस्य, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.